नि. फौ.ख.क्रं. १२०/२०२३
शासन वि. सुभाष व ३ इतर
नि.क्र. ३८/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०१ यांची शपथेवर जबानी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | राजेश विठ्ठल झांजे |
| वय | : | ४२ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | वाहिरा ता. आष्टी जि. बीड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत**

०१. मी घरी पत्नी, आई–वडील व दोन मुलांसोबत राहतो. आरोपी क्र. १ ते ४ चुलत भाऊ असल्याने त्यांना ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. **नि. ३७** वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र. १ ते ४ यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर. घटना दि. २३/१/२०२३ रोजी मी वाहिरा शिवरातील खडीक्रेशर कामाला होतो. मला मुलगा रोहन याचा फोन आला व म्हणाला की, आरोपी क्र. १ ने मला ये कुत्र्या तुझे काय काम आहे असे म्हणाला व शिवीगाळ करुन मारहाण केली. मी ५.३० वाजण्याच्या सुमारास घरी आलो. घरी आई, पत्नी व लहान मुलगा होता. मी आई गिरजाबाई हिला घेऊन चिसकुट वस्तीवर गेलो. तेथे गेल्यावर आरोपी क्र. १ ने आईला शिवीगाळ करुन चापटाने मारहाण केली व मुलगा रोहन याला ढकलुन दिले. मुलगा, मी व आई घरी आल्यावर आरोपी क्र. १ गावात जाऊन आरोपी क्र. २ संतोषला घेऊन आला. त्यानंतर आरोपी क्र. १ ते ४ काठ्या घेऊन घरी आले. घरी फिर्यादी धुणे धुत होती. आरोपी क्र. १ व ३ यांनी फिर्यादीस व आईला अंगणात ओढले व मारहाण केली. आरोपी क्र. २ व ४ यांनी मला बांबुच्या काठीने मारहाण केली. शेजारील श्रीकांत मोहन झांजे यांनी भांडणे सोडवली. मी पत्नीला व आईला घेऊन ८.००–८.३० वाजण्याच्या सुमारास अंभोरा पोलीस स्टेशनला गेलो. त्यांनी कडा येथे सरकारी दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. मी, पत्नी, आई दवाखान्यात गेलो व उपचार घेतले. उशीर झाल्याने घरी गेलो.

२. दुसऱ्या दिवशी पुन्हा अंभोरा पोलीस स्टेशन येथे गेलो व आरोपींविरुध्द पत्नीने फिर्याद दिली. पोलीसांनी घटनेबाबत चौकशी करुन माझा जबाब नोंदवला. आरोपीने ज्या काठीने

मारले ती पाहिल्यास ओळखु शकतो. साक्षीदारास मुद्देमाल जी.एम.पी. ४०/२०२५ बांबुची काठी दाखवण्यात आली. साक्षीदाराने काठी तीच असल्याचे ओळखले. मुद्देमालास नि. **एम.ओ. १** देण्यात आलेला आहे.

**सरतपास पुर्ण**

**आरोपी क्र. १ ते ४ तर्फे विधीज्ञ श्री. बी.एम. झांबरे यांच्यातर्फे उलटतपास सुरु.**

३. माझे शिक्षण झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मला आकडेमोड व घड्याळ समजत नाही. मला लिहता वाचता येत नाही. मला सही करता येते. मी पुर्वीपासुन वाहिरा येथे राहतो. मी गाव सोडुन बाहेरगावी कामासाठी गेलो नाही. मला ट्रक्टर चालवता येतो. मला वाहिरा येथे ४.५ एकर बागायत शेती आहे. शेती स्वतः करतो. मी कामाला बाहेरगावी गेल्यावर शेती पत्नी व आई करते. हे म्हणणे खरे आहे की, शेती बागायती असल्याने शेतात नेहमी काम असते. त्यासाठी घर काम आवरुन शेतात जावे लागते. दादासाहेब झांजे, योगेश रामचंद्र झांजे, भाऊसाहेब झांजे यांना ओळखतो. योगेश झांजे वाहिरा येथील उपसरपंच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दादासाहेब व भाऊसाहेब यांचे आताच्या निवडणुकीत एकमेकांविरुध्द पॅनल होते. हे म्हणणे खरे आहे की, मी, श्रीकांत व योगेश झांजे एका पॅनलचे आहोत. श्रीकांत माझ्या वस्तीपासुन १०००–१५०० फुट अंतरावर राहण्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्रीकांतच्या शेजारी भाऊसाहेब विश्वनाथ झांजे, फक्कड झांजे, सिताराम झांजे, मिनीनाथ, अशोक यांच्या वस्त्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तेथे ५–५० लोकांच्या वस्त्या आहेत. बाजुला लागुन व पुर्व व उत्तरेला वस्त्या आहेत. माझ्या वस्तीपासुन वाहिरा १.५ –२ कि.मी. अंतर आहे. वाहिरा ते अंभोरा २५ कि.मी. अंतर आहे.

४. अंभोरा ते कडा अंदाजे ३० कि.मी. अंतर आहे. अंभोरा ते सुलेमान देवळा अंतर सांगता येत नाही. सुलेमान देवळा गाव माहिती आहे. सुलेमान देवळा येथे सरकारी दवाखाना आहे. रस्त्यापासुन २०० फुटावर आमच्या वस्ती आहे व जवळ दगड–गोट्याचे माळरान आहे. घटनेच्या दिवशी शेजारचे ५–५० लोक जमले होते. त्यातील सर्व लोक ओळखीचे होते. त्यांनी भांडणे सोडवण्याचा प्रयत्न केला नाही. आमच्या कांद्याच्या चाळीला घरगुती बांबुच्या बेटाचे बांबु लावले

आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बेटातील सर्व बांबु लहान मोठे आहेत. चाळीला सारख्या उंचीचे सारख्या अंतरावर बांबु लावतात. हे म्हणणे खरे आहे की, काही बांबु लहान मोठे असल्याने वाया जातात. कांदाचाळ ३–३.५ फुटाची आहे.

५. पोलीसांनी माझा दारासमोर जबाब घेतला. तो संगणकावर टाईप केला. अमान्य की, पोलीस संगणक घरी घेऊन आले. पोलीस स्टेशनला आई व पत्नीला घेऊन चारचाकी गाडी घेऊन गेलो होतो. पोलीसांना मी मोटारसायकलवर गेल्याचे सांगितले नाही. ज्याच्या गाडीत पोलीस स्टेशनला गेलो त्या गाडीचा क्रमांक, गाडी चालकाचे नाव व पत्ता पोलीसांना सांगितला नाही. माझ्याकडे तसेच मुलगा रोहनकडे फोन होता. पोलीसांनी फोन मागितला नाही. आम्ही देखील स्वतःहुन दिला नाही. अमान्य की, घटनेच्या दिवशी मी, पत्नी व आई हौसराव झांजे यांच्याकडे ११.०० ते ६.०० वेळात कामाला गेलो होतो. साक्षीदार सांगतो की, ११.०० ते ५.३० वाजेपर्यंत कामाला गेलो. रविकांत पांडुळे यांच्या खडीक्रेशरवर कामाला होतो ते २.५ ते ३ कि.मी. अंतरावर आहे. ते माळ रानावर आहे. रविंकांतला मुलाचा फोन आलेबाबत सांगितले नाही. कामावरुन मधुनच यायचे असेल तर मालकाची परवानगी घ्यावी लागते.

६. आरोपी क्र. १ रोहनला ये कुत्र्या असे म्हणाल्याबाबत व आरोपी क्र. १ ने आईला मारहाण केलेबाबत फिर्याद देण्यापुर्वी माझी पत्नीसोबत चर्चा झाली नाही. आम्ही घर ते अंभोरा, अंभोरा ते कडा व तेथुन घरी जातांना व येतांना चालक सोबत होता. घटनेनंतर पत्नीसोबत कोणतीही चर्चा झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पत्नीसोबत वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची व आमची जमीन शेजारी आहे. अमान्य की, बांधावरुन आरोपीसोबत सारखी कुरकुर होते. आरोपी क्र. ४ संजय नोकरीस आहे. आमचे इतर भावकीशी भांडणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत माझे आप–आपसात पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत बोलणे होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ च्या मुलीच्या लग्नाला मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ४ संजय ग्रामपंचायतला उभा होता.

७. मी स्वतः फिर्याद देण्याचा प्रयत्न केला नाही. पोलीसांना जबाब देतांना, मी ५.३०

वाजता घरी आलो, रोहनला आरोपी क्र. १ ने ढकलुन दिले, आरोपी क्र. १ आरोपी क्र. २ ला गावात जाऊन घेऊन आला, आरोपी क्र. १ व ३ यांनी फिर्यादीस व आईला अंगणात ओढले, आरोपी क्र. २ व ४ यांनी मला बांबुच्या काठीने मारहाण केली, हा मजकुर पोलीसांना जबाब देतांना सांगितला होता. परंतु तसा मजकुर माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण सांगता येत नाही. पोलीसांसोबत वाद नाही. घटनेच्या दिवशी फिर्याद दिली नाही. अमान्य की, मुद्देमाल काठी पोलीसांना मी कांदाचाळीची काढुन दिली. अमान्य की, सरतपासात नमुद घटना घडलेबाबत खोटे सांगत आहे. अमान्य की, कडा येथे दवाखान्यात गेलो नाही. अमान्य की, आई, पत्नी व मी विचारकरुन बांधाच्या वादातुन आरोपींविरुध्द खोटी केस केली. अमान्य की, मी दवाखान्यात गेलो नाही. परंतु डॉक्टरांनी तपासले नाही. अमान्य की, आरोपींना त्रास देण्यासाठी खोटी केस केली व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.२०.०३.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH
Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.03.23 11:08:46 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी